## मनाई आदेश

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश.**

**ज्याअर्थी,** दिनांक २१/१०/२०२२ ते २६/१०/२०२२ रोजी या कालावधीत दिवाळी सण साजरा होत आहे. दिवाळी सण उत्साहात साजरा करताना नागरीकांच्याकडून तात्पुरते फटाके स्टॉल चा परवाना घेवून फटाके विक्री केली जाते तसेच फटाके उडविले जातात.

दिवाळी सणानिमित्त दरवर्षी तात्पुरते फटाके परवाने या कार्यालयाकडून देण्यात येतात. दिवाळी सण उत्साहात साजरा करताना नागरीकांच्याकडून फटाके विक्री करत असताना कायदयामध्ये विहीत नियम व अटींचे काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. जेणेकरून कोणत्याही प्रकारचा धोका अथवा अपघात होवू नये. त्यामुळे सर्व तात्पुरते फटाका विक्री करणारे परवानाधारक स्टॉल व फटाके वाजवणारे यांनी कायदयातील तरतुदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

परंतु, काही नागरीकांच्याकडून कायदयामधील नियमांचे उल्लंघन केले जाते तसेच विनापरवाना व सुरक्षितेतेच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना न केल्यानेमुळे मानवी आरोग्याला व जिवीताला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्याकरीता महाराष्ट्र शासनाने तसेच मा.जिल्हाधिकारी, पुणे, मा.राष्ट्रीय हरित लवाद न्यायालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, मा.संयुक्त मुख्य विस्फोटक नियंत्रक, पेट्रोलियम एवं विस्फोटक सुरक्षा संगठन कार्यालय, बेलापुर, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या आदेश व निर्देशाप्रमाणे दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके स्टॉलवर फटाके व्रिकी करताना कोणत्याही प्रकारचा धोका अथवा अपघात होवू नये याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस स्टेशन हददीत विनापरवाना तात्पुरते फटाके स्टॉल लावून फटाके विक्री करणे, दोन फटाके स्टॉलमध्ये ३ मीटरपेक्षा कमी अंतर ठेवणे, आग प्रतिबंधक उपाययोजना न करणे (वाळूची बादली आग प्रतिबंधक साहीत्य), पादचारी मार्गावर फटाके स्टॉल उभारणे, अग्निशामन व विदयुत विभाग यांचे प्रमाणपत्र न घेणे, वाहण पार्कींग व्यवस्था न करणे, गुन्हगारी पार्श्वभूमीचे व्यक्तीकडून तात्पुरते फटाके स्टॉल लावणे, फटाका विक्री परवान्याची मुदत संपल्यानंतर फटाके अथवा शोभेची दारू यांची विक्री करणे, कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यांपासून ५० फुट अंतराचे आत कोणत्याही प्रकारची शोभेची दारू अगर कोणत्याही नावाने ओळखले जाणारे फटाके फेकणे, सोडणे, उडविणे, अगर फायर बलून किंवा अग्निबाण उडविणे, दिवाळी सणांच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके उडविणे, ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणारे फटाके उडविणे, शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्याचा वापर कुठल्याही वेळेत करण्यात येऊ नये. शांतता प्रभागामध्ये रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये यांच्या सभोवतालचे १०० मीटर पर्यंतचे क्षेत्रात फटाके वाजवणे/उडविणे, निर्धारीत करण्यात आलेल्या वेळेव्यतीरीक्त फटाके वाजविणे/उडविणे इत्यादी मुळे अपघात होण्याची शक्यता आहे तसेच मोठया आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणारे ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेच्या आरोग्यावर व जिवीतास धोका होण्याचा संभव आहे अशी माझी खात्री आहे.

**त्याअर्थी, मी अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी असा आदेश देतो की, दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाका स्टॉलवर कोणत्याही प्रकारचा धोका अथवा अपघात होवू नये तसेच ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये, **विनापरवाना तात्पुरते फटाके स्टॉल लावून फटाके विक्री करणे, दोन फटाके स्टॉलमध्ये ३ मीटरपेक्षा कमी अंतर ठेवणे, आग प्रतिबंधक उपाययोजना न करणे (वाळूची बादली आग प्रतिबंधक साहीत्य), पादचारी मार्गावर स्टॉल उभारणे, अग्निशामन व विदयुत विभाग यांचे प्रमाणपत्र न घेणे, वाहण पार्कींग व्यवस्था न करणे, गुन्हगारी पार्श्वभूमीचे व्यक्तीकडून तात्पुरते फटाके स्टॉल लावणे, फटाका विक्री परवान्याची मुदत संपल्यानंतर फटाके अथवा शोभेची दारू यांची विक्री करणे, कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यांपासून ५० फुट अंतराचे आत कोणत्याही प्रकारची शोभेची दारू अगर कोणत्याही नावाने ओळखले जाणारे फटाके फेकणे, सोडणे, उडविणे, अगर फायर बलून किंवा अग्निबाण उडविणे, दिवाळी सणांच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके (११५ डेसीबल पेक्षा जास्त आवाजाचे) उडविणे, ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणारे फटाके उडविणे, शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्याचा वापर कुठल्याही वेळेत करणे, निर्धारीत करण्यात आलेल्या वेळेव्यतीरीक्त रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत संपूर्ण बंदी फटाके वाजविणे/उडविणे व विक्री करणे याकरीता या ओदशान्वये मनाई करीत आहे.**

**हा आदेश दिनांक १९ .१०.२०२२ रोजी ००.०१ वा. ते दिनांक २६.१०.२०२२ रोजीचे २४/०० वा. पर्यंत अंमलात राहिल.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. हा आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे संपुर्ण परिसरामध्ये लागू होईल.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक १९.१०.२०२२ रोजी दिलेला आहे.**

**(अंकुश शिंदे)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड